आर.सी.सी.क्र.२४/२०२१
**<u>नि.२३</u>**

**सरकारतर्फे सा.क्र.१**
मी या व्दारे सत्य प्रतिज्ञेवर निवेदन करतो की
माझे नांव : शशिकांत छोटू चक्रनारायण,
वय : ४९ वर्षे, धंदा : मजुरी,
राहणार : नेवासा खुर्द, ता. नेवासा, जि. अहमदनगर.

**<u>सरतपास सरकारतर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एच.चव्हाण यांचे मार्फत</u>** -

मला पोलीसांनी पोलीस स्टेशनला पंचनाम्यावर सही करण्यासाठी बोलवले होते. मी पोलीस स्टेशनला गेलो व तेथे पंचनाम्यावर सही केली. मजकुर मी वाचून पाहिला नव्हता. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी अनुक्रमांक २ वर सही आहे. मजकुराबाबत मला काहीही माहिती नाही. सहीस **नि.२४** देण्यात येते.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे त्यास भारतीय पुरावा कायदा १८७२ कलम १५४ प्रमाणे पुरावा घेण्याची परवानगी अभियोग पक्षास विनंती वरुन देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, मला पो.हे.कॉ. मरकड यांनी लाखेफळ येथे फिर्यादी चंदा सुखदान यांच्या घरासमोर घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी बोलवले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे घटना ठिकाण मला व पोलिसांना फिर्यादी चंदा सुखदान हिने दाखवले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटना ठिकाण हे फिर्यादीच्या राहते घरासमोर होते. हे मला माहित नाही की, घटना ठिकाणच्या पुर्वेस गावठाण जागा आहे, पश्चिमेस आरोपीची जमीन आहे, उत्तरेस आवारे वस्ती लाखेफळकडे जाणारा रस्ता आहे व दक्षिणेस आरोपीचे राहते घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझे समक्ष घटनास्थळावरुन अडीच फुट लांब रुंदीची काठी जप्त केली होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी घटना ठिकाणी माझे समक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला, तो मला वाचून दाखवला व त्यावर माझी सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे ॲड.जे.आर.नजन यांचे मार्फत नाकारला.</u>**

उलटतपास पुर्ण, फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती,

सही/-
**(ए.एन.सरक)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
न्यायालय क्र.३ नेवासा

दिनांक :२२/०५/२०२४